Research Papers

'टारफुला' कादंबरीतील ग्रामीण जीवन

प्रा . नारायण शिवशेट्टे
मराठी विभाग
पानसरे महाविद्यालय अर्जापूर .

प्रस्तावना :—

शंकर पाटील यांनी १९४७ पासूनच कथा लेखनाला प्रारंभ केला आहे . व एक प्रयोगक्षम कथालेखक म्हणून त्यांना नाव मिळालेलं आहे . जवळ जवळ सतरा वर्षे कथालेखन केल्यानंतर ते कादंबरी लेखनाकडे वळलेले आहेत . तसेच त्यांचे समकालीन ग्रामीण कथा लेखक व्यंकटेश माडगूळकर रणजित देसाई इ . आणि नंतरचे उध्दव शेळके यासारखी कथा लेखक असणारे लेखकमंडळी कादंबरीकार म्हणून कधीच स्थीर झालेली आहे . "टारफुला" ही कादंबरी १९६४ ला प्रसिध्दा झालेली असली तरी तिचे लेखन १९६२६३ लाच कधीतरी झालेले असले पाहिजे हे लेखन करण्यापूर्वी मराठी कादंबरीवद्दलचा एक आठवणी वना लेळ शंकरपाटील यांनी लिहिला आहे . या लेखात त्यांनी मराठी कादंबरी वद्दलचे एक तीव्र असमाधान व्यक्त केले आहे . पुढे 'धग' या कादंबरीचे परीक्षण करीत असताना १९६० सालातील मराठी कादंबरी लाज आणणे आहे . असे त्यांनी अतिशय स्वच्छपणे आणि निर्भीडपणे सांगून टाकाले आहे .

शंकर पाटील हे जाणीवपूर्वक लेखन करणारे कलावंत आहेत . तेव्हा 'टारफुला' च्या लेखनामागे निश्चित काही वेगळया जाणिवा असल्या पाहिजेत . शंकर पाटील यांना या कादंबरीतून काय सांगावयाचे आहे अशा कोणत्या नव्या जाणिवा या कादंबरीमध्ये प्रकटल्या आहेत आणि या जाणिवा प्रकट करताना त्यांना कितपत यश आले आहे . प्रकटल्या आहेत आणि या जाणिवा प्रकट करताना त्यांना कितपत यश आले आहे . असे काही महत्त्वाचे प्रश्न येथे उपस्थित होतात .

एकूणच मराठी कादंबरीचा विचार करताना सर्वप्रथम जाणवणारी बाब जर कोणती असेल तर ती म्हणजे ती कादंबरी कुठल्या ना कुठल्या व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवूनच साकार होत असते . या उलट शंकर पाटील यांच्या 'टारफुला' मध्ये कुठल्याही एखादी व्यक्ती केंद्रस्थानी नाही किंवा तिला नायक नाही . कादंबरीच्या प्रारंभी गावचेमूळ पाटील थोडेसे चित्रित होतात न होतात तोच त्याचा मृत्यू होतो . येथूनच पुढे गावाचा कारभार बघणारी कारभारात मदत करणारी माणसे बदलत जातात . मुल पाटलच्या मृत्यूनंतर संपूर्ण गावाची व्यवस्था बगण्याची जबावदारी आबा कुलकर्णीवर पडते . म्हणून कादंबरीच्या पहिल्या भागात आबा कुलकर्णी आणि गावाचे व्यवहार चित्रित होत जातात . पहिल्या भागच्या शेवटी आबा कुलकर्णी या गावातील दोन प्रमुख व्यक्ती गेल्या तरी गाव आहे तिथेच आहे एवढेच नव्हे तर गावात पेटलेला संघर्ष अधिकच बडकलेला आहे . पाटलाचे वारस कोण हा प्रश्न आता अधिकच चिघळत जाणार आहे .

या कादंबरीतील दुस-या भागाची सुरूवातच मुळी गावात बदली पाटील येतो तेथून होते . दादापाटील हे महारायांकडून पाठविण्यात आलेले या गावचे नवे पाटील अंगाने रगदार आणि हिमतीने तगडा असा हा माणूस चार भावांसह गावात येऊन पाटीलकीची सुत्रे हाती होतो . राऊनाना त्यांना सल्लामसलत देऊलागतात आणि गावाचा कारभार सुरू होतो . गावातला संघर्ष हळूहळू थांबू लागतो . त्याची उग्रता कमी होत जाते . त्याबरोबरच गायकवाड पवार आणि इतरांनी बळकावलेल्या जमिनी हळूहळू पाटलांच्या ताब्यात येत जातात . डुसरा भाग संपतो . तेव्हा या गावाच्या संदर्भात दोन बाबी घडलेल्या आहेत एक म्हणजे दादा पाटलांचा दरारा गावात प्रस्थापित होऊन संपूर्ण गावावर त्यांची सत्ता प्रस्थापित झाली आहे आणि राऊनानांचा खुन झालेला आहे .

म्हणजे दुस-या भागात दादा पाटील ही व्यक्ती कायम असलीळ तरी गायकवाड पवार राऊनानांची मुले आबा कुलकण्यांची मुले या सर्वांनाच महत्त्वाचे स्थान मिळत जाते . याचा अर्थच असा की या कादंबरीतील तिन्ही भागांमध्ये मिळून कुठल्याही एका व्यक्तीला प्रमुख केंद्रवर्ती स्थान कादंबरीकार देत नाही .

'टारफुला' या कादंबरीची सुरूवात अतिशय परिणामकाकर अशी होते . प्रथमतः शंकर पाटील गावाच्या आजूबाजूस असणारे डोंगर त्या डोंगरातल्या खिंडी त्या खिंडीत राहणारे फरारी आणि मग कल्लोबाचे हिरवेकंच उभे करतात . या रानाच्या शेजारी असणारे गाव उभे करतात . या डोंगरातून जाताना गावच्या पाटलाच्या सारवट गाडी समोर कशाप्रकारे सर्व फरारी नम्र होऊन . उभे राहतात . षाचे चित्रण करून पूर्वीच्या पाटलांचा दराराच टिपतात .

या पाटलाचे रूप उभे करताना अर्थातच त्यांचा दरार जसा लक्षात येतो त्याप्रमाणेच त्याच्यामुळे गावाला मिळणारे संरक्षणही लक्षात येते . फर्रायांचे ते एका अर्थाने आश्रयदातेही आहेत . कमी पडलं तर वाडयात येऊन मागावे .

Please Cite This Article As: प्रा . नारायण शिवशेट्टे , 'टारफुला' कादंबरीतील ग्रामीण जीवन : **Indian Streams Research Journal (March ; 2012)**

परंतु गावाला त्रास देऊनये असा त्यांच्यात अलिखित करायच आहे. अशा पध्दतीने फरारी पाटलांशी वागतात. परंतु या चित्रणातुन केवल पाटील तेवढाच चित्रित होतो असे नाही. तर त्यावरोवरच गावाचे एक सुखवस्तु रूपही सूचित होऊन जाते. पाटलाच्या खांद्यावर आपला भार टाकून गाव निवांतपणे आपल्या उद्योगात रमले आहे.

कल्लोवाच्या पोटात बसलेल्या गावाचे हे सुखवस्तू रूप आणि सत्तेचा दरारा प्रथमतः शंकर पाटील चित्रित करतात. एके दिवशी असा दरार असणारा पाटील अचानक मृत्युमुखी पडतो काय होत काय नाही हे कळायच्या आत तो मुजरा घेता घेता संपतो त्याचा दरार एवढाकी त्याच्या तडफडर्णाया देहाला हात लावण्याची कोणाची प्रज्ञा नाही.

पाटलांचा मृत्यू होतो आणि परिवर्तनाला प्रारंभ होतो. शांत सुखवस्तू असणारे गाव ढवळून निघते. घावाचे रूपच वदलायला लागते. पाटलांची मालमत्ता प्रचंड या मालमत्तेवरलक्ष ठेवून गावातील भाऊवंद आता गोंधळ धाकायला लागतात. संपूर्ण गाव कितीतरी दिवस याच गोंधळात वुडून जाते.

शांत सुखवस्तू गावाचे हे दुसरे रूप गावातील पाटलांचे भाऊ वंद म्हणजे गायकवाड आणि केरूनांना पवार हे दोघेही आता आपला मुलगा दत्तक घ्यावा म्हनून प्रयत्नशील आहेत. संगर्षाचे वीज हे असे आहे ह्या दोघांचे पिठीनाद वैर आहे. त्यामुळे हा संघर्ष अधिकच तीव्र होतो.

शंकर पाटील यांना संबंध खेडयाचे चित्रण तर करावयाचे आहेच परंतु त्यावरोवरच त्या खेडयात कमाने घडणारे परिवर्तनही चित्रिट करावयाचे आहे. या परिवर्तन चकाला परत दोन छोटी चके आहेत. ती म्हणजे सत्तापरिवर्तन चक आनि सत्ताविरोधी परिवर्तन चक ज्याप्रमाणे दात्यांच्या चकामध्ये दुसरी दात्यांची चके गुंतुज एकाच वेळी सर्वच च्के फिरायला लागतात. गतीचे एक प्रचंड रूप दिसायला लागते तसेच येथेही आहे. अने कवि परिवर्तन चकांमधून एका संबंध गावाचे परिवर्तन साकार होत जाते. म्हणूनच हा नराठीतला अत्यंत अभिनव आणि महत्त्वाचा प्रयोग आहे. असे वाटते.

या कादंवरीतील ग्रामीण जीवनातील विविध स्तरांचे आकलन शंकर पाटील यांनी अतिशय समर्थपणे करून 'ग्रामीणत्वाचे' स्वरूप येथे प्रकट केले आहे. त्याचवरोवर अत्यंत गतिमान निवेदनातून आणि समर्थ मनोविश्लेषणातून येथील व्यक्तिरेखा ठसठशीत होत जातात. त्यावरोवरच संपूर्ण एक खेडेच व्यक्तित्त्वसंपन्न होऊन उभे राहते. भाषा ही नेटकी सूचक क्वचित काव्यारूमकतेच्या जवळ जाणारी अशी आहे.

संदर्भ ः

१. शंकर पाटील - टायफुला.
२. आनंद यादव - ग्रामीण साहित्य ः स्वरूप आणि समीक्षा.
३. नागनाथ कोत्तापल्ले - शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास.
४. अ.वा.कुलकर्णी -प्रतिष्ठान मार्च १९७२.
५. अनंत कानेकर - महाराष्ट्र साहित्य पत्रिका जाने मार्च १९६१.

Please Cite This Article As: प्रा.नारायण शिवशेट्टे, 'टारफुला' कादंबरीतील ग्रामीण जीवन : **Indian Streams Research Journal (March ; 2012)**